# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – ४११ ००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७ | फॅक्स क्र. ०२०-२६१२५६९६

संकेत स्थळ : dydepune.com | ई मेल : dydpune@gmil.com


जा.क्र.शिऊसं/माध्य-४०२/खाते मान्यता/२०२०/ 3200 | दिनांक 10 MAY 2021

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद पुणे

विषय : ३.१ ची मान्यता मिळणेबाबत.

मॉडर्न इंग्लिश स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, शेळगांव, ता.इंदापूर, जि.पुणे

(स्वयंअर्थसहाय्यीत शाळा)

संदर्भ :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१९/प्र.क्र.१२२७/एसएम-२ दिनांक २०.०९.२०१९

२.या कार्यालयाचे पनवानगी पत्र क्र.जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२ /स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/ ९९ दिनांक-०६.०१.२०२०

३. आपला प्रस्ताव जा.क्र.पुजिप/उच्च मरध्य/२०२०/३६३४ दिनांक ०९/१२/२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये आपण प्रस्ताव सादर केल्यानुसार माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ मधील शर्तीची पूर्तता करण्याच्या व तपासणी अहवालात नमूद केलेल्या अटींची पूर्तता तसेच या कार्यालयाचे पनवानगी पत्र क्र. जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२०/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/ ९९ दिनांक-०६.०१.२०२० मधील अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अटीवर नियम क्र.५.१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालील दर्शविलेल्या स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस खात्याची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| जिल्हा | संस्थेचे व शाळेचे नांव | माध्यम | खात्याची प्रथम मान्यता दिल्याचे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | वर्ग | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| पुणे | धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित मॉडर्न इंग्लिश स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, शेळगांव, ता.इंदापूर, जि.पुणे | कला,वाणिज्य व विज्ञान-इंग्रजी | २०२०-२१ | ११ वी | इ.११ वी इंग्रजी माध्यमाच्या वर्गास स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून ३.१ खाते मान्यता देण्यात येते. |

( औदुंबर उकिरडे)

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी,

१. मा.शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१
२. विभागीय सचिव, महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर,पुणे
३. अध्यक्ष, धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे
४. मुख्याध्यापक, मॉडर्न इंग्लिश स्कूल अँन्ड ज्यू.कॉलेज, शेळगांव, ता.इंदापूर, जि.पुणे

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/ ५४/2020
पुणे 1 दिनांक : २४ ९/2020

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी पुणे संचलित मॉडर्न इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज शेळगाव ता . इंदापूर जि.पुणे

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय क्रमांक जा.क्र. एसएसएफ-1019/प्र.क्र.1227/एसएम-2 ,दिनांक-20/9/2019
3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.शिउंस/प्राथ-202/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/2019-20/99, दिनांक-6.1.2020

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ. 1 ली ते इ.8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी पुणे | मॉडर्न इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज शेळगाव ता . इंदापूर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.1 ली ते इ.8 वी | २०१९-२० |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनुसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन 2018-19 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतींचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएसएफ/प्र.क्र.735/एसएम-2, दिनांक-6.8.2018 तील अटी शर्तीतील मुद्दा क्र.2 चे पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.
9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

परवानगी वर्ष : २०१९-२०
माध्यम : इंग्रजी
स्वंयअर्थ सहाय्यित शाळा
दर्जावाढ (राज्यमंडळ)

यशवंतराव चव्हाण भवन,
जा.क्र.शिक्षण/माध्य/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०२०-२१/६२१
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद
दिनांक : २/२/२०२१
2-2-2021

प्रति,
मुख्याध्यापक,
मॉडर्न इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, शेळगाव, ता.इंदापूर, जि.पुणे

**विषय :** सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी जून-२०२० पासून इ.९ वी च्या इंग्रजी माध्यम वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत
**धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित मॉडर्न इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, शेळगाव, ता.इंदापूर, जि.पुणे**

**संदर्भ :** १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई यांचील शासन निर्णय क्र. **एसएसएस-२०१९/प्र.क्र.१२२७/एसएम-२ दि.२०/०९/२०१९**
२) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचे पत्र **जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वंयशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/**
**९९ दि. ६/१/२०२०**
**३) अध्यक्ष, धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे पत्र क्र. ३/२०२० दि. ५/१०/२०२०**
**४) अध्यक्ष, धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे पत्र क्र. २/२०२१ दि. ११/१/२०२१**

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित मॉडर्न इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, शेळगाव, ता.इंदापूर, जि.पुणे** या माध्यमिक शाळेच्या **इंग्रजी** माध्यम वर्गाला संदर्भीय पत्र क्र. २ नुसार सन महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. आता आपले संस्था संदर्भीय पत्र क्र. ३ अनुषंगाने **इ.९ वी च्या वर्गासाठी नैसर्गिक वाढीने जून २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून जून २०२० पासून इंग्रजी माध्यम साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१. प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील **सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे**
४. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५. संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२. अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१९-२०** पासून असेल
१३. शैक्षणिक वर्ष **२०१९-२०** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१४. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१५. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा /दर्जावाढ परवानगी प्राप्त** शाळा दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
१६. महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
१७. महाराष्ट्र स्वंयअथसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील. १८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.
६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.
७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.

वरील निर्धारित केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळाल्यास शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

2.2.21

(सुनंदा वाखारे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.
२. अध्यक्ष/सचिव, अध्यक्ष, धनाजी संताजी एज्युकेशन सोसायटी, पुणे

प्रत : माहितीसाठी सविनय सादर

३. मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
४. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
५. निवडनस्ती